Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# सम्राट अशोकाच्या शिलालेखांच्या शोधाचा प्रवास

**कवानकर शरद गंगाधरराव**

सम्राट अशोकांच्या शिलालेखांपासून भारताच्या लिखित इतिहासाचा प्रारंभ होतो, हे निर्विवाद सत्य आहे. या शिलालेखांच्या पूर्वीचा लिखित पुरावा सध्यातरी उपलब्ध नाही. आपली नीतिपर शिकवण आणि इतिहास हा दगडांवर कायमस्वरूपी कोरून ठेवण्याच्या अशोकांच्या दूरदृष्टीपणाचे आणि बुद्धिमतेचे कौतुक करावेसे वाटते. सम्राटाच्या या शिलालेखांचा शोधप्रवास हा देखील त्याच्या व्यक्तिमत्वाइतकाच रंजक आहे.

1750 साली सर्वात पहिल्यांदा पाद्री टायफेनथालर यांना दिल्ली मेरठ येथील स्तंभलेख आढळला. त्याची लिपी व भाषा माहित नसल्यामुळे त्यांनी फक्त त्याची नोंद करून ठेवली. 1785 मध्ये ह्यरिंग्टन यांनी बाराबर आणि नागार्जुनी डोंगरावरच्या लेणींना भेट दिली व पहिल्यांदाच या लेणींची इतिहासात नोंद झाली. तेथील शिलालेख देखील नोंदवून ठेवण्यात आला. याच काळामध्ये कॅप्टन पोलियर यांनी दिल्ली टोपरा येथील स्तंभलेख शोधला आणि त्याचे चित्र काढून सर विलियम जोन्सकडे पाठवून दिले. सर विलियम जोन्स यांनी हा स्तंभलेख आणि त्या बरोबरच अलाहाबाद कोसम येथील कॅप्टन जेम्स होरे यांनी शोधलेला स्तंभलेख हे दोन्ही 1801 साली 'एशियाटिक रिसर्चेस' मध्ये प्रकाशित केले व त्याचा अर्थ शोधण्याचे आवाहन सर्व अभ्यासकांना केले. 1822 मध्ये मेजर जेम्स टॉड यांनी गिरनारचा शिलालेख शोधला. याच काळात अलाहाबाद येथील टांकसाळीत अधिकारी असलेला जेम्स प्रिन्सेप, या सर्व स्तंभलेख आणि शिलालेखांची लिपि समजावून घेण्याची धडपड करत होता. खंदाहर मध्ये सापडलेल्या खरोष्टी लिपीतील शिलालेख आणि येथील शिलालेखांच्या लिपीवर जेम्स प्रिन्सेपचे संशोधन चालू होते. 1834 साली बंगाल एशियाटिक सोसायटीच्या जर्नलमध्ये लेफ्टनंट बर्ट यांनी केलेल्या अलाहाबाद स्तंभलेखाचे चित्रण व जेम्स प्रिन्सेपने शोधलेले काही लिपींची अक्षरे प्रकाशित करण्यात आली. 1835 साली कॅप्टन लान्ग यांनी गिरनारचा शिलालेख कापडावर लिहून मुंबईच्या डॉ. विल्सनकडे पाठविला जो त्यांनी जेम्स प्रिन्सेपकडे भाषांतरासाठी पाठवून दिला. 1836 च्या उत्तरार्धात महाराज रणजितसिंहांच्या दरबारी असलेल्या फ्रेंच अधिकारी कोर्ट यांनी शाहबाजगढी येथील शिलालेख शोधला व त्याची नक्कल करून जेम्स प्रिन्सेपकडे पाठवली. सगळीकडून येत असलेले स्तंभलेख आणि शिलालेखांचे चित्रण आणि नक्कल पाहून जेम्स प्रिन्सेपने ही लिपि शोधून काढण्याचा ध्यास घेतला. सतत सहा महिने, दिवस रात्र प्रचंड मेहनत घेऊन जेम्स प्रिन्सेपने अशोकांच्या शिलालेखांची स्वर, व्यंजन, वर्णमाला तयार केली. 1837 साली सर्वात पहिल्यांदा दिल्ली, टोपरा येथील अशोकांच्या स्तंभलेखाचे वाचन जेम्स प्रिन्सेपने केले व त्याचे प्रकाशन केले. त्यानंतर लगेचच त्याने लौरिया आरिया आणि लौरिया नंदनगढ येथील स्तंभलेखांचे वाचन केले.

मेजर पेव यांनी दिल्ली मेरठ येथील स्तंभलेखाचे संपूर्ण दृश्यप्रत बनवली जी प्रिन्सेपने प्रकाशित केली. याच वर्षाच्या शेवटी लेफ्टनंट कीटोय यांनी धौली येथील अशोकाचा एक महत्त्वाचा शिलालेख शोधून काढला. हा शिलालेख शोधत असताना त्यांच्या जीवावर बेतले होते. खरं तर धौली येथे लेफ्टनंट कीटोय 1836 सालीच गेले होते, मात्र या शिलालेखाच्या पायथ्याशी एक अस्वल आपल्या दोन बछड्यांबरोबर राहत

होती. कीटोयला पाहताच अस्वलीने त्यांच्यावर हल्ला केला आणि नाईलाजस्तव कीटोय यांना तिच्यावर गोळी झाडावी लागली. जखमी झालेल्या कीटोय यांना परत फिरावे लागले. मात्र या शिलालेखाचा शोध घ्याचाच म्हणून ते परत 1837 साली तेथे गेले तेव्हा त्यांना मोठे झालेले दोन्ही बछडे दिसले. त्यांना हुसकावून लावून कीटोय यांनी दगडावर चढून हा शिलालेख लिहून घेतला व जेम्स प्रिन्सेपकडे पाठविला. याचे संपूर्ण वर्णन त्यांनी जर्नल मध्ये प्रकाशित केले आहे. 1838 मध्ये जेम्स जेम्स प्रिन्सेपने गिरनार आणि धौली येथील शिलालेखांचा तौलनिक अभ्यास केला आणि तो प्रकाशित केला. 1839 साली रावेनशॉ यांनी शाह कबिराउद्दीनच्या मदतीने सासाराम, बिहार येथील शिलालेख लिहून घेतला.

1840 साली मेसन यांनी शहाबाजगढी येथे जाऊन तेथील शिलालेखाची दृश्यप्रत बनवली व प्रकाशित केली. यूरोप मधील अभ्यासक नॉरीस यांनी अभ्यास करून खरोष्टी लिपीतील '**देवानंपियास**' हा शब्द शोधून काढला. याच साली बैराट येथी भाब्रु शिलालेख कॅप्टन बर्ट यांनी लिहून काढला आणि तो कॅप्टन कीटोय यांनी पंडित कमलाकांत यांच्या मदतीने लिप्यांतरित केला. हे सर्व शिलालेख अशोक नावाच्या सम्राटाने लिहिले आहे, याची खात्री जेम्स प्रिन्सेपला पटली, मात्र ठोस पुरावा सापडत नव्हता, कारण कुठल्याच शिलालेखांमध्ये हे नाव आढळत नव्हते.

जेम्स प्रिन्सेपने शिलालेखांच्या लिपीला "**अशोकन स्क्रिप्ट**" किंवा **Indic script** हे नांव दिले. याच वर्षी प्रिन्सेपचे कामाच्या प्रचंड ताणांमुळे, अवघ्या चाळीसाव्या वर्षी निधन झाले. मात्र अशोकांच्या शिलालेखाचे शोधकार्य आणि भाषांतराचे काम थांबले नाही. जेम्स प्रिन्सेपने तयार करून दिलेल्या वर्णमालाच्या साह्याने अनेक अभ्यासक हे काम करत राहिले. 1850 साली सर वॉल्टर इलियट यांनी ओडिशा येथील जौगडा येथे असलेला अशोकाचा शिलालेख शोधून त्याची दृश्यप्रत बनवली. अभ्यासांती त्यांनी हा शिलालेख शहाबाजगढी, गिरनार आणि धौली यांच्या सारखाच आहे हे सिद्ध केले. 1860 साली फॉरेस्ट यांनी देहरादून येथील कालसी या ठिकाणाचा शिलालेख शोधून काढला. या शिलालेखाच्या दगडावर संपूर्ण शेवाळ पसरले होते. 1870 मध्ये कर्नल एलिस यांनी मध्य प्रदेशातील रुपनाथ येथील शिलालेख शोधून काढला. 1872 मध्ये कार्लाईल यांनी राजस्थानातील बैराट येथील लहान शिलालेख आणि बिहार मधील रामपूरवा येथील स्तंभलेख शोधून काढला. 1879 साली सर अलेक्झांडर कंनिंगहम यांनी अशोकाचे शोधलेले सर्व शिलालेख, स्तंभलेख यांच्या लिप्यांतरांचे व भाषांतराचे संकलन करून 'कॉर्पस इन्स्क्रिप्टोनम इंडिकारम' च्या पहिल्या भागात प्रकाशित केले. याची संकल्पना जेम्स प्रिन्सेपचीच होती आणि अजून शिलालेख सापडू शकतील हे गृहीत धरून कनिंगहम यांनी पहिला भाग प्रकाशित केला व नंतर सापडणारे शिलालेख दुसऱ्या भागात प्रकाशित करावे असे सूचित केले. सम्राट अशोकाचे शिलालेख शोधण्याचे काम अविरत चालू होते. 1882 साली डॉ. भगवानलाल इंद्रजी यांना मुंबई जवळील सोपारा येथे शिलालेख सापडला. 1889 साली कॅप्टन लेह यांना पाकिस्तानातील मनशेरा (मानसेहरा) येथे अशोकाचा शिलालेख सापडला. 1891 साली लेविस राईस यांना म्हैसूर येथे तीन शिलालेख सापडले. 1895 साली फ्युरर यांनी नेपाळ येथील निगाली सागर येथे स्तंभलेख शोधला तर 1896 साली त्यांनीच रुम्मिनदायी येथील स्तंभलेखही शोधला. 1905 साली ओर्टेल यांनी सारनाथ येथील स्तंभलेख शोधला. 1915 साली कर्नाटक येथील रायचूर जिल्ह्यातील मस्की येथील सोन्याच्या खाणीचे इंजिनियर बेडॉन घरी परतत असताना त्यांना अचानकपणे एका दगडावर शिलालेख दिसला. हा शिलालेख अतिशय महत्त्वाचा ठरला कारण

आत्तापर्यंतच्या सर्व शिलालेखात '**देवानं पियदस्सी राज्ञो**' एवढंच लिहिले होते त्यामुळे हे शिलालेख कोणी लिहिले हे कळत नव्हते. मात्र मस्की येथील शिलालेखात प्रथमच '**देवानं पियदस्सी राज्ञो असोक**' लिहिलेले आढळले आणि भारतात अशोक नावाचा सम्राट होऊन गेला आणि त्यानेच हे सर्व शिलालेख लिहिले ही माहिती जगाला प्रथमच कळाली. संशोधकांना या महान सम्राटाच्या राज्याची कल्पना आणि त्याने लिहिले नीतिपर शिकवणीचा परिणाम भारताबरोबरच इतर देशांवर कसा झाला याची माहिती मिळाली. या देशावर सम्राट अशोक नावाचा महान राजा होऊन गेला हे जेम्स प्रिन्सेपचे संशोधन खरे ठरले. या सर्व शिलालेखांचे लिप्यांतर आणि भाषांतराच्या कामात अनेक संशोधक आणि अभ्यासकांनी स्वतःला वाहून घेतले. फ्रँके, स्मिथ, फ्लीट, मायकलसन, ल्यूडर्स, थॉमस, हल्ट्झ, भांडारकर, जयस्वाल, बरुआ आणि वूलनर यांनी अशोकांच्या शिलालेखांवर खूप काम केले. 1925 साली हल्ट्झ यांनी शिलालेखाचा कॉर्पस मध्ये दुसरा भाग प्रकाशित केला.

उपरोक्त भागामध्ये आपण सम्राट अशोकाच्या शिलालेखांचा प्रवास कसा झाला व कोणकोणत्या संशोधकांचे यात योगदान होते हे पाहिले या भागात आपण भारतीय उपखंडातील शिलालेखांतील अभ्यासावरून ज्यांनी 'खरोष्टी' व 'धम्मलिपि' चा शोध लावला त्या जेम्स प्रिन्सेप यांच्या संशोधन कार्याचा मागोवा घेऊया कारण त्यांच्या संशोधनाला येथे उर्धिंगत केले नाही तर, तो एका संशोधकावर अन्याय होईल.

जेम्स प्रिन्सेप 1819 मध्ये जेव्हा भारतात आले तेव्हा ते 20 वर्षांचे होते . जेम्स हे जॉन व सोफिया याचे 10 वे अपत्य होते. 1771 मध्ये जेम्स यांचे वडील, जॉन यांनी भारतात येऊन अमाप पैसा कमावला होता व भारतातील संधी पाहून आपल्या मुलांनाही भारतात पाठवले . जेम्स प्रिन्सेप यांना इंजीनियरिंग व आर्कीटेक्ट या विषयात खूप आवड होती. वडिलांच्या ओळखीने जेम्स प्रिन्सेप यांना भारतात, कलकत्ता येथील टांकसाळीत 'अस्से मास्टर' म्हणजे 'पारख करणारा' म्हणून काम मिळाले.

वर्षभरातच त्यांची वाराणसीच्या टांकसाळीत बदली करण्यात आली. त्यांची कामाची प्रगती बघून थोड्याच अवधीत त्यांना बढतीवर पुन्हा कलकत्त्याला बोलविण्यात आले. टांकसाळीत अस्से मास्टर म्हणून काम करताना त्यांना अनेक नवीन प्रयोग करता आले व त्यांनी नवीन उपकरणांचा शोध घेतला. टांकसाळीतील प्रचंड मोठ्या भट्टीतील अचूक तापमान मोजण्याचे उपकरण किंवा 0.19 ग्रॅम एवढ्याशा धातूचे वजन करण्याचे तराजू हे त्यापैकी काही उपकरणे जेम्स प्रिन्सेप यांनी तयार केली.

वाराणसीमध्ये असताना, जेम्स प्रिन्सेप तेथील अनेक इमारतींच्या शिल्पकलेने भारावून गेले. वाराणसीच्या टांकसाळीचे डिझाईन, तेथील चर्च, वाराणसीला रोगराई पासून बचाव करण्यासाठी सांडपाणी वाहून नेणारी भूमिगत भुयारे, औरंगजेबच्या मिनारांची दुरुस्ती आणि दगडी पूल हे सर्व जेम्स प्रिन्सेप यांच्या कल्पकतेची आजही साक्ष देतात. कलकत्त्याला आल्यानंतर जेम्स प्रिन्सेप यांनी नाणे संशोधनावर भर दिला. जेम्स प्रिन्सेप यांना 'जर्नल ऑफ एशियाटीक सोसायटी' चे संपादक करण्यात आले आणि त्यात त्यांनी रसायनशास्त्र, खनिज, नाणेशास्त्र, भारतातील प्राचीन वास्तू, स्थळे, हवामान बदल व पर्यावरणावर अनेक लेख प्रसिद्ध केले. मात्र जेम्स प्रिन्सेप यांची खरी ओळख जगाला झाली ती त्यांच्या लिपि संशोधानामुळे.

जेम्स प्रिन्सेप तसे खऱ्या अर्थाने भाषातज्ञ किंवा लिपितज्ञ नव्हते, मात्र त्यांना संशोधनाची आवड होती. प्रत्येक गोष्टीची सखोल माहिती ते मिळवायचे. प्राचीन नाण्यावर काम करीत असताना त्यातील अक्षरे त्यांना खुणवू लागली. त्या अक्षरांचे संशोधन तोपर्यंत सिमित होते. या अक्षरांमध्ये व अलाहाबादच्या

स्तंभावरील अक्षरांमध्ये काहीतरी साम्य आहे असे वाटल्याने जेम्स प्रिन्सेप यांनी त्याचा पाठपुरावा करायचे ठरविले. ओरिसा मधील काही खडकांवर देखील त्यांना काही अक्षर कोरल्याचे कळाले. बिहार मधील बेतिहा या ठिकाणाचे काही शिलालेखांचे ठसे त्यांनी मागविले. त्यांनी भारतातील अनेक संस्कृत पंडितांना याबद्दल विचारले मात्र कोणाला ते सांगता आले नाही. ब्याक्टेरिया आणि कुषाण यांची इंडो ग्रीक नाण्यांचा अभ्यासातून त्यांनी 'खरोष्ठी' या प्राचीन लिपिचा शोध लावला. त्यांचा हा निबंध एशियाटीक सोसायटीच्या जर्नल मधे प्रसिध्द झाला आणि संपूर्ण भारतातून लोकांनी त्यांच्याकडे अनेक शिलालेखांचे ठसे, नाणी, हस्तलिखिते पाठवून दिली.

एवढेच नव्हे तर महाराजा रणजीतसिंह यांचे फ्रेंच जनरल जें बाप्तीस्ते वेन्तुरा यांनी रावलपिंडी मधील उत्तखणनात सापडलेली काही शिलालेख पाठवून दिले. (याचा उल्लेख वरील भागात आला आहे.) शिलालेखातील अभ्यासातून जेम्स प्रिन्सेप यांनी सर्वात प्रथम शोध लावला तो "दानं" या शब्दाचा कारण अनेक शिलालेखांच्या शेवटी हा शब्द लिहिला होता. 1837 मध्ये प्रथमच भारतातील शिलालेखांमधील अक्षरांचा शोध प्रिन्सेप यांनी लावला. पुढे सम्राट अशोकाचे शिलालेख वाचताना त्यांच्या प्रत्येक वेळीस आलेला "देवानांपिय पियदस्सिन" हे कोणाला उद्देशून आहे हे कळत नव्हते. प्रिन्सेप यांना वाटले की, हा कोणी श्रीलंकेचा राजा असावा कारण 'महावंस' मधून तेथील देवानांपिय राजाचे नाव मिळत होते. मात्र श्रीलंकेच्या राजाचे हे शिलालेख किंवा स्तंभलेख भारतात कसे काय हा प्रश्न प्रिन्सेप यांना पडला. सतत 6 आठवड्यांच्या अथक प्रयत्नानंतर, अनेक शिलालेख वाचल्यानंतर व त्यांचे मित्र जॉर्ज टर्नर यांनी श्रीलंकेतील पालि भाषेतील पाठविलेल्या काही संदर्भ ग्रंथावरून देवानांपिय पियदस्सिन म्हणजेच सम्राट अशोक असल्याचे प्रतिपादन प्रिन्सेप यांनी केले. या सर्व शिलालेखांमधे सम्राट अशोकाच्या न्याय, नीती व लोक कल्याणाचा मार्ग हे समान सूत्र लिहिले आहे.

या शोधानंतर प्रथमच जगाला अशोक नावाच्या सम्राटाचा शोध लागला. अनेक शिलालेखांच्या अभ्यासातून प्रिन्सेप यांनी सम्राट अशोकाचे सारे आयुष्य जगासमोर ठेवले. जवळपास 2200 वर्षे अशोक नावाचा कोणी सम्राट या देशात होऊन गेला याचे कोणा गावीही नव्हते. 1915 मधे कर्नाटकातील मस्की येथील शिलालेखात सम्राट अशोकाचे नाव दिसले आणि प्रिन्सेप यांच्या अचूक अभ्यासाची कल्पना आली. या सर्व शिलालेखांचे आणि प्रिन्सेप यांच्या कार्याचा गौरव साऱ्या जगाने केला. पुढे प्रिन्सेप यांनी भारतातील शिलालेखांच्या संशोधनाला वाहिलेल्या "Corpus inscriptionium indicarium" या नावाची ग्रंथाची मालिका प्रकाशित करण्याचा सुतोवाच केला जो पुढे जाऊन सर अलेक्झांडर कन्निंगहमने 1877 ला प्रकाशित केला. जेम्स प्रिन्सेप यांच्या लिपि शोधामुळे भारतातील 'अन्तियोकोस' आणि ग्रीक राजांच्या बरोबरच भारतातील अनेक राजांचा इतिहास कळाला. प्रिन्सेप यांनी अफगानिस्तान मधील शिलालेखांचा देखील अभ्यास केला. शिलालेखांच्या अभ्यासावरून प्रिन्सेप यांनी सम्राट अशोकाच्या प्रचंड राज्याची माहिती लोकांसमोर आणली. प्रिन्सेप यांनी शिलालेखांच्या अभ्यासाचा धडाकाच लावला.

दररोज 18 ते 20 तास त्यांचे संशोधन चाले. अतिपरिश्रमामुळे प्रिन्सेप यांना प्रचंड डोकेदुखीचा त्रास होऊ लागला. हवाबदल व उपचारासाठी त्यांना इंग्लंडला हलविण्यात आले, मात्र 22 एप्रिल 1840 साली उण्यापुऱ्या 41 व्या वर्षी प्रिन्सेप यांचे निधन झाले. भारतीय शिलालेखातील सर्वात प्राचीन असलेली 'धम्मलिपि' व 'खरोष्टी लिपि' यांचा शोध आणि त्यातून सम्राट अशोक व त्याचे कार्य जगासमोर येऊ शकले

ते केवळ जेम्स प्रिन्सेप यांच्यामुळेच. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण अर्थात A.S.I. ची स्थापनेचे बीज प्रिन्सेप यांनी रोवले होते.

प्रिन्सेप यांनी केलेल्या कामाची दाखल घेत कलकत्तावासियांनी त्यांच्या स्मरणार्थ हुगल नदीकाठी "प्रिन्सेप घाट' बांधला तर इंग्लंडमध्ये सरकारच्या वतीने त्यांच्या नावाचे मेडल बनविले. जॉन रोयाले नावाच्या जीवशास्त्रज्ञाने एका झाडाच्या प्रजातीचे नाव 'प्रीन्सेपिया' ठेवले. एशियाटिक सोसायटीने त्यांचा अर्धपुतळा बसविला. 1771 मधे पहिल्यांदा आलेल्या जॉन प्रिन्सेप नंतर प्रिन्सेप घराण्याच्या 4 पिढ्यांनी भारतात वास्तव्य केले. नुकतेच जेम्स प्रिन्सेप यांच्या चवथ्या पिढीतील मुलाने जेम्स प्रिन्सेप यांचे जपून ठेवलेले सारे हस्तलिखितांचे पेटारे अभ्यासासाठी भारत सरकारच्या हवाली केले. सम्राट अशोकाचे शिलालेख शोधण्याचा या 270 वर्षांचा अथक प्रवास अतिशय महत्त्वपूर्ण आणि भारताच्या इतिहासाला नवीन वळण देणारा ठरला.

**संदर्भ :**

मुले गुणाकर – अक्षर बोलते हैं , (२००५) यात्री प्रकाशन दिल्ली
मिश्र नरेश – नागरी लिपि (१९९९) मोनू प्रकाशन दिल्ली
http://www.lankalibrary.com/geo/dera1.html
http://www.hindu.com/2007/12/20/stories/2007122054820600.htm